# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 15/06/2020 (सोमवार)
(सकाळ)

### खून

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 04 कि. मी अंतरावर जावराबोडी येथे दिनांक 14/06/2020 चे 20.00 वा. दरम्यान राजेश उर्फ मुन्ना कांबळे(मृतक), वय 45 वर्ष, रा. मनिष नगर उर्वेला कॉलनी वर्धा रोड, नागपूर यांच्या शेतात एक वर्ष पुर्वी आरोपी नामे– लक्ष्मण पुराम, वय 48 वर्ष रा. जावराबोडी हा महीनेवारी कामाला होता. तेव्हा मृतक हा एक वर्ष करीता तडीपार होता. त्यावरून आरोपीने मृतकचे शेतातील मालाची परस्पर विक्री करून मालाचे पैसे स्वतः घेतले होते. यावरून त्यांच्यात वाद सुरू होता दि. 14/06/2020 चे 20.00 वा. दरम्यान मृतक हा पैसे मागण्याकरीता आरोपीचे घरी गाडी घेवुन गेला असाता पैसेच्या कारणावरून मृतक व आरोपी यांच्यात वाद होवुन आरोपीने धारधार शस्त्राने राजेश कांबळेच्या डोक्यावर, कपाळावर मारहाण करून त्यास जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शैलेश दिगांबर कांबळे, वय 43 वर्ष, रा. मनिष नगर उर्वेला कॉलेनी, वर्धा रोड नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. महेश भोरटेकर 9511843370 हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 0.5 कि.मी अंतरावर आझाद वार्ड रामटेक येथे दिनांक 13/06/2020 ते दिनांक 14/06/2020 चे 22:00 वा. ते 05:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रेमलाल किसन बनगैया, वय 42 वर्ष, रा. आझाद वार्ड रामटेक यांचे घराचे मागील दाराची अज्ञात आरोपीने कुंडी तोडुन घराचे आत प्रवेश केले. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 69,827/– रू. व नगदी 45,000/– रू. असा एकुण 1,14,827/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्रीकांत हत्तीमारे 9834323960 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. पारशिवनी :– दि. 14/06/2020 चे 07:00 वा. सुमारास 30 वर्षीय पिडीत/फिर्यादी हिला आरोपी नामे– 1) लालु एकनाथ, 2) हरीष एकनाथ, 3) अर्जुन एकनाथ, 4) क्रिष्णा एकनाथ यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून पीडितेस घराबाहेर ओढुन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीतांनी पीडितेस व इतरांना शिवीगाळ करून काडीने मारहाण करून जखमी केले व परत मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 354, 452, 323, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा दिलीप बासोडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर